ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 8484. Licence No. 53.

वर्ष ११ | पुणें, बुधवार तारीख ११ डिसेंबर, १९५५ | अंक ४७

## विविध माहिती

**भारतामधील साखरेचें उत्पादन**—भारतीय सरकारनें परदेशांतुन साखर आयात करावयाची नाहीं असें ठरविलें आहे. साखरेच्या चालू हंगामांत आतांपर्यंत सर्वांत अधिक, म्हणजे १६ लाख टन साखरेचें उत्पादन झाल्यामुळें हा निर्णय घेण्यांत आला आहे. १९५३-५४ सालच्या हंगामांत १०·०१ लाख टन साखर निर्माण करण्यांत आली होती. ह्यापूर्वी आयात करण्यांत आलेल्या साखरेपैकीं ८,४९५ टन साखर पाकिस्तानला विकण्याचें ठरलें आहे.

**तंबाखूच्या निर्यातीनें प्राप्ती**—भारताला तंबाखूची निर्यात करण्यामुळें दरसाल १२·३ कोट रुपयांचें परदेशी चलन मिळतें असा अंदाज करण्यांत आला आहे. तंबाखूच्या निर्यातीवर घेण्यांत येणाऱ्या करामुळं राष्ट्रीय उत्पन्नांत दरवर्षी ३३ कोटी रुपयांची भर पडते. तंबाखूच्या उत्पादनांत अमेरिकेचा पहिला, चीनचा दुसरा आणि भारताचा तिसरा अनुक्रम लागतो.

**गुळावरील विक्रीकर**—उत्तर प्रदेशांतील गूळ व खंडसारी साखर तयार करणाऱ्या धंदेवाल्यांची परिषद भरली होती. परिषदेंत गुळावरील विक्रीकर घेण्याचें राज्य सरकारनें बंद करावें अशी मागणी करण्यांत आली. हा धंदा ग्रामोद्योगाच्या स्वरूपाचा असून त्यांत लाखो लोक गुंतलेले आहेत. करामुळें ३० ते ४० टक्के धंदेवाल्यांना धंदा बंद करावा लागला, अशी तक्रार करण्यांत आली.

**आवाजाच्या वेगाचीं विमानें**—गेल्या जानेवारीपासून ब्रिटनमध्यें आवाजाच्या वेगानें उड्डाण करणाऱ्या १०० जेट विमानांना अपघात होऊन त्यांचे वैमानिक ठार झाले. मनावर पडणारा असह्य ताण व असंख्य यांत्रिक नोंदी करणाऱ्या घड्याळाच्याकडे द्यावें लागणारें अवधान, ह्यामुळें त्यांचा विमानावरील ताबा सुटतो असें मत व्यक्त करण्यांत येत आहे.

**ब्रह्मदेशाला रशिआचें साह्य**—ब्रह्मदेशाच्या विकासयोजनांना रशिआनें मदत देण्याचें कबूल केलें आहे. शेती, पाटबंधारे आणि उद्योगधंदे ह्या सर्व बाबतींत मदतीचें व सहकार्याचें आश्वासन रशिआनें दिलें आहे. दोन्ही देशांनीं एकमेकांशीं सांस्कृतिक, तांत्रिक व शास्त्रीय बाबतींतहि सहकार्य करण्याचें ठरविलें आहे.

**नागपूर जिल्ह्यांत तांब्याच्या खाणी**— नागपूर जिल्ह्यांतील अंबर तहसिलींत तांब्याच्या खाणी सांपडल्या आहेत. पूर्वी ह्या खाणी चालू होत्या. खाणीच्या आसपासच्या प्रदेशांत मोठ्या प्रमाणावर तांबें सांपडण्याची शक्यता आहे. भूस्तरखात्यातर्फे अधिक तपास चालू आहे.

**परदेशीय व्यापारासाठी कॉर्पोरेशन**—भारताचा परदेशांशीं होणारा व्यापार वाढून तो अधिक पद्धतशीर व्हावा म्हणून स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशनची स्थापना करण्याचें मध्यवर्ती सरकारनें ठरविलें असल्याचें समजतें. सध्या परदेशांशीं होणाऱ्या खाजगी व्यापाराशीं कॉर्पोरेशनतर्फे होणारा व्यापार जुळवून घेण्यांत येईल. भारताच्या औद्योगीकरणाचा वेग वाढविण्यासाठी जरूर त्या मालाची आयात कॉर्पोरेशनतर्फे मुख्यतः करण्यांत येईल.

**नव्या खगोल वेधशाळेचें ठिकाण**—मध्यवर्ती सरकारतर्फे स्थापन करण्यांत येणाऱ्या नव्या वेधशाळेसाठी अनेक ठिकाणांबद्दल विचारणा होत आहे. उज्जैन, उदयपूर, दौलताबाद, औरंगाबाद व मध्यप्रदेशांतील अमरकंटक ह्यांपैकी कोठेंतरी ती स्थापन केली जाण्याचा संभव आहे. नवीन खगोल वेधशाळा ही भारतामधील सर्वांत मोठी होईल.

**राहता भाग सहकारी साखर-कारखाना**—राहता भाग सहकारी साखर कारखान्याला भारतीय सरकारच्या उद्योग खात्याकडून परवाना मिळाला आहे. कारखान्याच्या उभारणीसाठी मध्यवर्ती इंडस्ट्रिअल फिनॅन्स कॉर्पोरेशनकडून ४५ लाख रुपयांचें कर्जहि देण्यांत आलें आहे. कारखाना उसाच्या शेतकऱ्यांनीं काढावयाचें ठरविलें असून त्यासाठी ८,२५,००० रुपयांचें भांडवलहि जमविलें आहे. मुंबई सरकार ह्या कारखान्यांत १० लाख रुपये गुंतवील.

**पाकिस्तान गहूं आयात करणार**—पाकिस्तानांत गव्हाचा तुटवडा पडल्यामुळें पाकिस्तानचें सरकार अमेरिकेकडून गहूं आयात करण्याचा विचार करीत आहे. राज्यांत गव्हाचाच नव्हे तर इतर अन्नधान्यांचाहि तुटवडा भासूं लागल्यामुळें आयात करावी लागत आहे असें पश्चिम पाकिस्तानचे अन्नमंत्री कर्नल अबीद हुसेन ह्यांनीं स्वतःच जाहीर केलें आहे.

**काश्मीर-रशिया व्यापार**—काश्मीरमधील कलाकुसरीच्या वस्तू रशिआंत निर्यात करण्याची शक्यता अजमावण्यासाठी पुढील वर्षी रशिआचें व्यापारी-मंडळ काश्मीरला येणार आहे. ह्या मालाच्या काश्मीरमधील किंमती स्वस्त असल्यांमुळें रशिआंत तो भराभर खपेल, असा अंदाज करण्यांत आला आहे.

**वादळामुळें झालेलें रेल्वेचें नुकसान**—मद्रास राज्याच्या किनाऱ्यावर झालेल्या प्रचंड वादळामुळें रेल्वेच्या मालमत्तेची ५ लाख रुपयांची हानि झाली, अशी माहिती लोकसभेंत सांगण्यांत आली. रेल्वेचे रूळ उखडून गेले, स्टेशनांच्या व रेल्वे-नोकरांच्या राहण्याच्या इमारती पडल्या, व इतरहि मालमत्तेला नुकसानी पोंचली.

**इटलीची भारताला मदत**—इटलीच्या परदेशीय व्यापार खात्याच्या मंत्र्यांनीं इटलीतर्फे भारताला तांत्रिक व आर्थिक मदत देऊं केली आहे. भारताच्या औद्योगिक विकासाच्या कामीं उपयोगी पडणारा भांडवली माल व दैनंदिन गरजा भागविणारा मालहि इटली पुरविण्यास तयार आहे, असें त्यांनीं सांगितलें. भारतीय सरकारच्या व्यापारखात्याशीं उभय देशांतील व्यापाराची वृद्धि करण्यासाठीं ते बोलणीं करणार आहेत.

**मॅनिला येथें अणुसंशोधन केंद्र**—फिलिपाइन्स द्वीपसमूहांतील मॅनिला ह्या शहरीं अमेरिकेच्या मदतीनें अणुशक्तीचें संशोधन करणारें एक केंद्र स्थापन करण्यांत येणार असल्याचें समजतें. अमेरिकेच्या अणुशक्ति-कमिशनचा व इंटर नॅशनल को-ऑपरेशन ॲडमिनिस्ट्रेशन ह्या अमेरिकन संस्थेचा ह्या उपक्रमास पाठिंबा आहे. अमेरिकन परराष्ट्रमंत्री मि. डलेस ह्यांनींहि या योजनेचा पुरस्कार केला आहे.

**स्वागताची नवी तऱ्हा**— रशियन पुढारी मि. बुलगॅनिन व मि. क्रुश्चेव्ह भारताच्या दौऱ्यावर असतांना त्यांचें अनेक ठिकाणीं उत्साहानें स्वागत करण्यांत आलें. पण राजस्थानमधील 'ज्वाला' ह्या हिंदी भाषेंतील पत्रानें एका नव्याच तऱ्हेनें त्यांचें स्वागत केलं. रशिअन पुढारी जयपूरला आले त्या दिवशीं ह्या पत्रानें आपलें एक संपादकीय रशिअन भाषेंत लिहिलें. रशिअन पत्रकाराच्या पुढाऱ्यानें ह्या स्वागताचें कौतुक केलं.

**भारतामधील रेल्वे-गाड्या** - भारतामधील रेल्वेगाड्यांतून होणारी प्रवाशांची खेचाखेच कमी करण्यासाठी १९५२ पासून ५०० नव्या गाड्या सोडण्यांत येत आहेत. त्याशिवाय ३०० गाड्या पहिल्यापेक्षा अधिक लांबचा प्रवास करूं लागल्या आहेत. भारतांत रोज सरासरी ४,७०० प्रवासी गाड्या धावतात. त्यांपैकी एक तृतियांशापेक्षां अधिक, मोठ्या शहरांतील उपनगरांना जोडणाऱ्या अततात.


॥ श्री ॥

# दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि. पुणें २.

॥ यत्न तो देव जाणावा ॥ समर्थ रामदास

नवीन हंगामाची साखर करण्यास प्रारंभ होऊन

"स्कोअर बोर्डावर" १० हजार पोतीं साखरेचा आंकडा लागला.

चालू हंगामांत दीड लक्ष पोतीं "स्कोअर" करण्याचें ठरविलें आहे.

::: म्हणजे :::

एक कोटि वीस लक्ष रुपयांची साखर तयार होईल.

सिंडिकेटच्या ज्या भागीदारांचीं मनें कलुषित करण्यांत आलीं त्यांच्या भेटी घेऊन विनंति करावयाची की

## सिंडिकेट म्हणजे "संयुक्त मध्यम वर्ग"

यामुळें

भांडवलवाल्याला शेअर विकणें उचित होणार नाहीं.

## * कार्यक्रम = मतपरिवर्तन * हृदयपरिवर्तन *

कॉमनवेल्थ बिल्डिंग,
९८० सदाशिव पेठ, लक्ष्मी पंथ, पुणें २.
दि. १५ डिसेंबर १९५५

चंद्रशेखर गोविंद आगाशे,
मॅनेजिंग एजंट्स.

# अर्थ

बुधवार, ता. २१ डिसेंबर, १९५५





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## मुंबई राज्यांतील सहकारी चळवळीचा विस्तार

### दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंतील तरतुदी

मुंबई राज्याच्या दुसऱ्या पंचवार्षिक योजनेचा ( १९५६–५७ ते ६०-६१ ) खर्डा प्रसिद्ध झाला आहे. त्यांत २८३ कोटी रुपये खर्चाची तरतूद आहे. ह्यांपैकीं ७,५८,६९,००० रुपये सहकारी खात्याच्या वांट्यास येणार आहेत. रूरल क्रेडिट योजनेसाठी रिझर्व्ह बँक ५ कोटी रुपये देणार आहे. त्या रकमेचा वरील रकमेंत समावेश केलेला नाहीं. रूरल क्रेडिट सर्व्हेनें केलेल्या शिफारसींना धरूनच सहकाराच्या दुसऱ्या पंचवार्षिक योजनेची आखणी केलेली आहे.

खेडेगांवांतून भांडवलपुरवठा करणाऱ्या सहकारी संस्था बळकट करून त्यांची अल्पकालीन, मध्यम मुदतीचीं व दीर्घ मुदतीचीं कर्जें देण्याची शक्ति वाढविण्याकरितां ८५·८१ लक्ष रुपये खर्चीं पडावयाचे आहेत. सहकारी संस्थांचे भाग खरीदण्यासाठी रिझर्व्ह बँकेकडून ४०० लक्ष रुपये मिळावयाचे आहेत, ते वेगळे. स्वतःची जमीन नसणाऱ्या शेतमजुरांना बेकारीच्या काळांत जगतां यावें, ह्यासाठी 'ग्रेन डेपो' ची योजना आखली आहे, तिचेवर १२·५ लक्ष रुपये खर्चीं पडावयाचे आहेत. सहकारी मच्छीमारीसाठी ११·१७ लक्ष रुपयांची तरतूद आहे. मचव्यांची बांधणी, दुरुस्ती, जाळीं विणणें, त्यांची दुरुस्ती, सोसायट्यांच्या व्यवस्था खर्चास मदत, इत्यादींवर ती खर्च केली जाईल.

सहकारी मार्केटिंगच्या विस्तारासाठी ८१·४५ लक्ष रुपये राखून ठेवण्यांत आले आहेत. सहकारी मार्केटिंग संस्था मजबूत करणें, प्राथमिक क्रेडिट संस्था व मार्केटिंग सोसायट्या ह्यांचा संबंध जोडणें, मालाच्या साठवणीसाठी गोडाऊन्स बांधणें, इत्यादींसाठी १६१·०६ लक्ष रुपयांची तरतूद केलेली आहे. विक्री केल्या जाणाऱ्या शेतमालाच्या ३०% माल सहकारी मार्केटिंगच्या कक्षेंत आणण्याचा सरकारचा विचार आहे. स्टेट वेअर हाउसिंग कंपनीची स्थापना रूरल क्रेडिट सर्व्हेच्या शिफारसीप्रमाणें केली जाईल, तिचें भागभांडवलांत भागदार होण्यासाठी ५० लक्ष रुपये राखून ठेवले आहेत. मालाच्या प्रतवारीच्या उपक्रमांसाठी तीन लॅबोरेटरी स्थापण्यांत येतील. त्यांत तूप, तेलें, इत्यादींची प्रतवारी लावण्याची व्यवस्था केली जाईल. त्याला १·६३ लक्ष रुपये लागणार आहेत. मार्केटिंग सर्व्हे व संशोधन, त्याचप्रमाणें "को–ऑपरेटिव्ह मार्केट न्यूज सर्व्हिस" ह्यांच्या योजना आंखण्यांत आल्या आहेत. कपास, मिरच्या, इसबगोल, इत्यादींसाठी प्रोसेसिंग सोसायट्या व फळें आणि भाजीपाला टिकविण्यासाठी ते डबाबंद करणाऱ्या सोसायट्या, ह्यांना प्रोत्साहन देण्यांत येणार आहे. सहकारी साखरकारखाने, हे प्रोसेसिंग सोसायट्यांतील महत्त्वाचे कारखाने होत. असे आणखी पांच सहकारी कारखाने स्थापले जातील. ह्या सर्वांसाठी १०१·५७ लक्ष रुपयांची तरतूद केली आहे.

सहकारी फार्मिंग, लिफ्ट-इरिगेशन, दूधनिर्मिति, दूधवांटप, इत्यादीं चळवळींचा पुरस्कार करण्यांत येणार आहे. सहकारी फार्मिंग सोसायट्यांसाठी ४६·५० लक्ष रुपये राखून ठेवण्यांत आले आहेत. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत २५ नव्या सहकारी लिफ्ट इरिगेशन सोसायट्यांची स्थापना करण्याचा बेत आहे. दरसाल २·३ कोटी पौंड दुधाची उलाढाल करणाऱ्या नव्या दूध-पुरवठ्याच्या सोसायट्या १९६०–६१ अखेर काम करूं लागतील, अशी अपेक्षा आहे. सहकारी तत्त्वावर शेतीच्या कामास वीजपुरवठा करणाऱ्या सोसायट्यांना उत्तेजन देण्याचा बेत आहे.

सहकारी खातें व नव्यानें स्थापन होणाऱ्या सहकारी संस्था ह्यांना लायक अधिकारी व नोकरवर्ग लाभावा ह्यासाठी ट्रेनिंगची खास व्यवस्था केली जाईल. त्याचप्रमाणें, प्रचाराचीहि तजवीज करण्यांत येईल. त्याला ३९·०० लक्ष रुपये खर्च अपेक्षित आहे. सहकारी खात्याची वाढ होणें स्वाभाविकच आहे. त्यासाठीं १५·०४ लक्ष रुपये लागतील. खात्यांतील आंकडे जमवून मांडणाऱ्या पोट-विभागाच्या वाढीसाठी आणखी ४·६५ लक्ष रुपये खर्च केले जातील. सावकारी कायद्याची अंमलबजावणी करणारी यंत्रणा सुधारण्यासाठी ८·१५ लक्ष रुपयांची तजवीज आहे.

वरील सर्व योजनांसाठी खालीलप्रमाणें खर्च येणार आहे:—

| | कोटी रु. |
|---|---|
| १ शेअर भांडवल घेणें | १·९० |
| २ कर्जें | ३·११ |
| ३ भांडवली खर्चाला मदत | ०·६९ |
| ४ वार्षिक सबसिडी व ग्रँट | १·०६ |
| ५ स्टाफ | ०·६६ |
| एकूण | ७·४२ |

शेअर भांडवलाला लागणाऱ्या रकमेपैकी निम्मी रक्कम भारत सरकारकडून, त्याचप्रमाणें कर्जापैकी निम्मी रक्कम भारत सरकारकडून मिळण्याची अपेक्षा आहे. स्टाफवरील सर्व खर्च मुंबई राज्य सरकारच करील. म्हणजे, सहकारी चळवळीप्रीत्यर्थ दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत मुंबई सरकार ३·९९ कोटी रुपये प्रत्यक्ष खर्च करील :—

| | कोटी रु. |
|---|---|
| १ स्टाफ | ०·६४ |
| २ शेअर भांडवल घेणें | ०·९५ |
| ३ कर्जें | १·५६ |
| ४ भांडवली खर्चाला मदत | ०·३४ |
| ५ वार्षिक सबसिडी व ग्रँट | ०·५३ |
| एकूण | ४·१७ |

भारत सरकारनें हौसिंगच्या दोन योजनांचा ("लो इन्कम ग्रुप हाउसिंग थ्रू को–ऑपरेटिव्ह सोसायटीज" व "सबसिडाइज्ड

इंडस्ट्रिअल हाउसिंग थ्रू को-ऑपरेटिव्ह सोसायटीज") पुरस्कार केलेला आहे. त्यांवर अनुक्रमें १·४७ कोटी रुपये व ३५·४० लक्ष रुपये खर्च येणार आहे. मुंबई सरकारला त्यासाठी जो जादा नोकरवर्ग ठेवावा लागेल, तेवढ्यांचाच फक्त खर्चाचा बोजा मुंबई सरकारवर पडणार आहे. तो २·३१ लक्ष रुपये होईल; बाकी सर्व खर्च भारत सरकार करील.

शक्तिमान, हितसंबंधी लोकांपासून सहकारी चळवळीचें संरक्षण करून, तिचे खरे फायदे खेड्यांतील प्रत्यक्ष उत्पादकाला मिळावेत, हा प्रस्तुत योजनांचा उद्देश आहे आणि त्यादृष्टीनें सहकारी चळवळीची दुसरी पंचवार्षिक योजना आंखण्यांत आली आहे.

---

### खताचे आणखी दोन कारखाने

दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कालावधींत आणखी दोन खतांचे कारखाने काढण्याचें भारतीय सरकारनें ठरविलें आहे. ह्या कारखान्यांच्या जागा अद्याप निश्चित करण्यांत आलेल्या नाहींत. तथापि, निरनिराळ्या ठिकाणांची तपासणी होऊन ह्या बाबतींत लवकरच निर्णय घेण्यांत येणार आहे. नवे कारखाने काढण्याबरोबरच सिंद्री येथील कारखान्याची उत्पादनक्षमता ६० टक्क्यांनीं वाढविण्याचेंहि ठरविण्यांत आलें आहे. पंजाबमधील भाक्रा-नांगल धरणाच्या आधारानें त्या ठिकाणीं एक नवा कारखाना उभारण्याचें घाटत आहे. ह्या कारखान्यांत ७०,००० टन नैट्रोजनयुक्त खतें तयार करण्यांत येतील. नव्या कारखान्यांच्या स्थापनेविषयीं विचार चालू असतां, हिंदुस्थान स्टील कंपनीकडून ह्यासंबंधी एक योजना मांडण्यांत आली. रूरकेला येथील कंपनीच्या कारखान्याच्या जागीं ७०,००० ते ८०,००० टन नैट्रोजनयुक्त खतें तयार करतां येईल, अशी माहिती कंपनीतर्फे देण्यांत आली. रूरकेला येथील पोलादाच्या कारखान्यांत पोलादाच्या उत्पादनाची कांहीं नवी प्रक्रिया सुरू करण्यांत येत असल्यामुळें कंपनीला हें शक्य झालें आहे. कंपनीतर्फे आलेल्या सूचनेचा सरकार सध्यां विचार करीत आहे. मुंबईनजीक ट्रॉम्बे बेटावर तेल शुद्ध करण्याचा कारखाना उभारण्यांत येत असतां तेथें नैसर्गिक गॅस असल्याचा शोध लागला. त्याचा उपयोग करून ट्रॉम्बेमध्यें खताचा कारखाना काढतां येईल किंवा काय, ह्याचाहि विचार चालू आहे. भारतीय सरकारनें खतांच्या उत्पादनाचा विचार करण्यासाठी एक कमिटी नेमली होती. ह्या कमिटीनें असें मत व्यक्त केलें आहे कीं, विजयवाडा हें ठिकाण नवा खताचा कारखाना उभारण्यासाठीं सोयीचें असल्यानें त्याचाहि विचार करण्यांत यावा.

---

### जगांतील भुयारी रेल्वे-रस्ते

भारतांतील कोणत्याहि शहरांत अजून भुयारी रेल्वे बांधण्यांत आलेली नाहीं. तथापि मुंबई व कलकत्ता ह्या शहरांतून अशा रेल्वे बांधण्याचा विचार चालू आहे. त्या बांधण्यांत पृष्ठभागावरील ताण कमी करण्याचा उद्देश आहे. आशिआ खंडांत जपानमधील टोकिओ व ओसाका ह्या शहरांतच काय तो भुयारी रेल्वे-रस्ता आहे. आफ्रिका खंडांत मात्र अशी एकहि रेल्वे नाहीं. मॉस्को शहरांतील भुयारी रेल्वेचा मार्ग ३७ मैल लांबीचा आहे. विशेष म्हणजे, मार्गावरील स्टेशनें कलापूर्ण अशीं आहेत. केवळ लांबीचाच विचार केला तर युरोपमधल्या १०–१२ शहरांतून तरी ह्यापेक्षा अधिक लांबीचा भुयारी रेल्वे-मार्ग आहे. लंडन शहरामधील भुयारी रेल्वेचा मार्ग जगांत सर्वांत अधिक, म्हणजे २४२ मैल लांब आहे. आणखी ११ मैल मार्ग नव्यानें बांधण्यांत येणार आहे. लंडनच्या खालोखाल न्यूयॉर्क शहरांतील भुयारी रेल्वेची लांबी आहे. पॅरीसमधील भुयारी रेल्वेरस्त्याची लांबी ११७ मैल आहे. ह्या रेल्वेला 'मेट्रो' असें नांव असून त्या रेल्वेंतून लंडनपेक्षाहि अधिक उतारूंची ने–आण करण्यांत येतें. जगांतील आणखी कांहीं शहरांतून अशा प्रकारचा रेल्वेरस्ता बांधण्यांत येत आहे. स्टॉकहोम, सिडने, रि–ओ–डी–जानेरो व बुडापेस्ट ह्या शहरांतून सध्या बोगदे खणण्याचें काम चालू आहे. न्यूझीलंडमधील चार मोठ्या शहरांतून भुयारी रेल्वे बांधण्यांत येणार आहे. युद्धोत्तर काळांतहि भुयारी रेल्वे रस्त्यांचा व्याप वाढतच चाललेला दिसून येतो. टोरँटो, रोम व ब्रुसेल्स ह्या शहरांतून भुयारी रेल्वे बांधण्यांत आल्या आहेत. स्पेन हा देश इतर युरोपिअन देशांच्या मानानें मागासलेला आहे. पण स्पेनमधील माद्रिद व बार्सिलोना ह्या शहरांतून भुयारी मार्ग आहे. माद्रीदमधील रेल्वेरस्त्याची लांबी १७ मैल आहे.

---

### साखरेच्या धंद्याचें आशादायी भवितव्य

बेलापूर येथील साखर कारखान्याच्या वार्षिक सभेंत बोलतांना कंपनीचे अध्यक्ष सर जोसेफ के ह्यांनीं साखरेच्या धंद्याचें भवितव्य चांगलें आहे, असें मत व्यक्त केलें. ते म्हणाले कीं, साखरेच्या उत्पादनाला सरकारनें जें उत्तेजन दिलें आहे त्यावरूनच ही गोष्ट सिद्ध होते. ह्या धंद्यासंबंधीं ज्या योजना तयार करण्यांत आल्या आहेत त्या जर अमलांत आल्या, तर येत्या दोन अगर तीन वर्षांत भारतांत सुमारें १२ सहकारी स्वरूपाचे साखरेचे कारखाने चालू होतील. १९६१ अखेर दरवर्षी दोन लाख टन साखर सहकारी साखर कारखान्यांकडून उत्पादन केली जाईल असा सरकारचा अंदाज आहे. नवीन कारखान्यांपैकीं बहुतेक कारखाने मुंबई राज्यांत निघणार आहेत. ह्यांपैकीं कांहीं कारखाने साकार होऊं लागले आहेत. कारखान्यांचें सभासदत्व दोन प्रकारचें आहे. पहिला वर्ग उत्पादक सभासदांचा व दुसरा सामान्य सभासदांचा. पहिला वर्ग हा स्वतः उसाचें उत्पादन करतो आणि तो उस ठराविक किंमत घेऊन सहकारी कारखान्याला विकतो. दुसरा वर्ग हा उसाचा उत्पादक नाहीं, पण भांडवल-उभारणींत भाग घेणारा असा आहे. सहकारी साखर कारखान्याच्या भागाची किंमत प्रत्येकी १,००० रुपये ठेवण्यांत आली आहे. त्यांपैकीं ७५० रुपये वसूल भांडवल म्हणून गोळा करण्यांत येत असून २५० रुपये भविष्यकालीन जबाबदारीसाठीं राखून ठेवण्यांत आलें आहे. साखरेचें चालू वर्ष आतां नुकतेंच संपलें आहे. हें वर्ष एकंदरीनें चांगलें गेलें. साखरेचें उत्पादन व उसाचें उत्पादन ह्या दोन्ही गोष्टींत गेल्या वर्षीपेक्षा ह्या वर्षी बरीच वाढ झालेली दिसून येते. गेल्या सालीं गुळाचे भाव पडल्यामुळें साखर कारखानदारांना अधिक ऊस मिळूं शकला. कारण, शेतकऱ्यांनीं आपला ऊस कारखानदारांना विकला.

---

**अमेरिकेची यांत्रिक जादूगिरी**—दिल्ली येथें भरलेल्या औद्योगिक प्रदर्शनाला सोव्हिएट नेते मि. बुल्गॉनिन व मि. क्रुश्चेव्ह ह्यांनीं भेट दिली. अमेरिकेच्या मंडपांत त्यांनीं १५ मिनिटें घालविलीं. ह्या ठिकाणीं त्यांना एक यांत्रिक हात दाखविण्यांत आला. हा हात सुईत दोरा ओवतो, बाटलीचें बूच काढतो व त्यांतील पेय पेल्यांत ओततो. ही जादू पाहून मि. क्रुश्चेव्ह म्हणाले कीं, हें यंत्र अद्भुत आहे, पण तें कांहीं पेय पिऊं शकणार नाहीं.

## कापसाच्या लागवडीच्या क्षेत्रांत ९·५% वाढ

भारतांत १९५५–५६ मध्यें १,५३,७३,००० एकर जमिनींत कापसाच्या पिकांची लागवड झाली असावी असें दुसऱ्या अ. भा. अंदाजावरून समजतें. १९५४–५५ मधील हाच दुरुस्त अंदाज १,४०,३९,००० एकर असा होता. म्हणजे यंदा १३,३४,००० एकरांनीं अगर ९·५ टक्क्यांनीं वाढ झाल्याचें दिसून येतें.

चालू व मागील वर्षांच्या अंदाजांचा तपशील ( १ ) कापसाचें व्यापारी क्षेत्रांतील नांव आणि ( २ ) कापसाच्या धाग्याची लांबी, देऊन पुढें दिलेला आहे—

### ( १ ) व्यापारी क्षेत्रांतील नांवानुसार

क्षेत्र ( हजार एकरांत )

| | १९५५-५६ दुसरा अंदाज | १९५४-५५ दुसरा अंदाज ( दुरुस्त ) | स्तंभ ३ पेक्षा स्तंभ २ मध्यें झालेली वाढ (+) अगर (–)घट |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| बंगाल | ७८१ | ७८४ | (–) ३ |
| अमेरिकन | २,३६५ | १,७३७ | (+) ६२८ |
| जरिला (विरनार धरून) | २,७५३ | २,४९५ | (+) ५२८ |
| वेरम | २६१ | ३३३ | (–) ७२ |
| एच (४२०) | ५२२ | ३९४ | (+) १२८ |
| उमरा | २,२०७ | २,५९८ | (–) ३९१ |
| हैद्राबाद गांवरान | १,०७७ | १,१८४ | (–) १०७ |
| माळवी | १,४९४ | ८९८ | (+) ५९६ |
| भडोच–विजय | १,०७१ | ९५७ | (+) ११४ |
| सुरती–सुयोग | ५८६ | २२५ | (+) ६१ |
| घोलेरा | १,२९१ | १,३९१ | (–) १०० |
| सदर्न्स | ९१२ | ६८५ | (+) २२७ |
| कोमिला | ५३ | ५८ | (–) ५ |
| एकूण | १५,३७३ | १४,०३९ | (+) १,३३४ |

### ( २ ) धाग्याच्या लांबीनुसार

क्षेत्र ( हजार एकरांत )

| धागा | १९५५–५६ दुसरा अंदाज | १९५४–५५ ( दुरुस्त दुसरा अंदाज | स्तंभ २ पेक्षा स्तंभ २मध्यें झालेली वाढ (+) अगर घट (–) |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| लांब धागा | ४,७६८ | ३,८०३ | (+) ९६५ |
| मध्यम धागा | ७,२७९ | ६,३९० | (+) ८८९ |
| लहान धागा | ३,३२६ | ३,८४६ | (–) ५२० |
| एकूण बेरीज | १५,३७३ | १४,०३९ | (+) १,३३४ |

सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि
राष्ट्रीय बचत योजना
व्याज ३ टक्के
माहितीसाठीं लिहा अगर भेटा
मुख्य ऑफिस: सारस्वत बँक बिल्डींग, मुंबई ४
शाखा: फोर्ट, दादर, माहीम, बेळगांव, पुणें

चालू वर्षीं कापसाच्या लागवडीच्या क्षेत्रांतील वाढ मुख्यतः मुंबई, मध्य भारत, पंजाब, मध्यप्रदेश आणि पेप्सु या राज्यांत झाली असून त्यास पेरणीच्या वेळचें अनुकूल हवामान व कापूस विस्तार योजनेखालीं केलेले प्रयत्न कारणीभूत आहेत. पेरणीच्या वेळीं असलेल्या कापसाच्या चढ्या किंमतीमुळेंहि ही वाढ झाली. तथापि, पावसाळ्याच्या प्रारंभीं पडलेल्या अपुऱ्या पावसामुळें कांहीं राज्यांत, विशेषतः सौराष्ट्रांत, लागवडीच्या क्षेत्रांत घट झाली. त्या घटीमुळें उपरोक्त राज्यांतील लागवडीच्या क्षेत्राच्या वाढीवर थोडासा परिणाम झाला.

कापसाच्या विविध जातींबाबत पाहतां, अमेरिका, माळवी, जरिला (विरनार धरून) आणि दक्षिणी (सदर्न्स) ह्या जातींच्या कापसाच्या लागवडीच्या क्षेत्रांत वाढ झाली, तर उमरा व घोलेरा जातींच्या कापसाच्या लागवडीच्या क्षेत्रांत घट झाली कापसाच्या धाग्याच्या लांबीनुसार पाहतां, लांब व मध्यम लांबीच्या धाग्याच्या कापसाच्या लागवडीच्या क्षेत्रांत चांगली वाढ झाली.

ह्या अंदाजांतील माहिती सामान्यतः सप्टेंबर १९५५ अखेरी-पर्यंतची आहे. तेथपर्यंत आंध्र, मुंबई, मध्यप्रदेश, पंजाब व हैदराबाद ह्या राज्यांतील कांहीं भाग वगळून इतरत्र पिकाची परिस्थिति सर्वसाधारणपणें चांगली होती. उपरोक्त भागांत मुसळधार पाऊस व महापूर यामुळें ह्या पिकाची नासाडी झाली. मुंबई राज्याच्या धारवाड जिल्ह्यांतील कांहीं भागांत प्रतिकूल वाऱ्यामुळें कापसाच्या रोपट्यांची किंचित् नुकसानी झाल्याचें समजतें.

ह्या अंदाजांत १९५५–५६ मध्यें ह्या पिकाखालील सर्वच क्षेत्राचा अंतर्भाव नाहीं. अंतिम अंदाजांतील लागवडीच्या क्षेत्राच्या अंदाजें ७५ टक्के क्षेत्राचा समावेश दुसऱ्या अंदाजांत असतो, असें मागील अनुभवावरून दिसतें.

**बिहार सरकारची बचत-योजना**— उत्तर बिहारमध्यें बांधण्यांत यावयाच्या गंडक नदीवरील धरणाचा समावेश राज्य-सरकारच्या दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत करण्यांत आला आहे. ह्या कामासाठीं ३६कोटी रुपये खर्च येणार आहे. बिहार सरकारनें दरवर्षी १ कोटि रुपयांची सेव्हिंग्ज सर्टिफिकिटें विकून पांच वर्षांत ५ कोटी रुपये बचतीच्या मार्गानें उभारण्याचें ठरविलें आहे.

स्थापना १९३६

## युनायटेड वेस्टर्न बँक, लिमिटेड, सातारा

[ शेड्यूल्ड बँक ]

हेड ऑफिस—*पॅलेस स्ट्रीट, चिरमुले निकेतन, सातारा.*

शाखा–मुंबई फोर्ट, मुंबई गिरगांव, पुणें, नासिक, बार्शी व लोणंद

ता. ३१-१२-५४ अखेर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १०,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | ६,५०,००० |
| रिझर्व व इतर फंडस् | रु. | २,१०,००० |
| ठेवी | रु. | ७८,९७,०३० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | ९१,००,००० |

मुदत ठेवीवरील व्याजाचे दर :

| १ वर्ष | दोन वर्षें | तीन वर्षें | ५ वर्षें |
|---|---|---|---|
| रु. २-८-० | रु. २-१२-० | रु. ३-०-० | रु. ३-८-० |

दहा अगर अधिक वर्षें रु. ४-०-० (चार फक्त)

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | १-८-० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | " | २-०-० |
| चालू डिपॉझिट | " | ०-८-० |

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., मॅनेजर.

शं. ह. साठे, बी. ए., एलएल. बी., चेअरमन

## 'अर्थ' ग्रन्थमाला

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

## दि बेळगांव बँक लिमिटेड

स्थापना १९३० : शेड्यूल्ड बँक

दक्षिण महाराष्ट्र व उत्तर कर्नाटकमधील पहिली शेड्यूल्ड बँक

शाखा:—१ संकेश्वर, २ होसूर बेळगांव, ३ गोकाक, ४ जयसिंगपूर, ५ वेंगुर्ला, ६ मालवण, ७ नंदगड, ८ गडहिंग्लज, ९ रामदुर्ग, १० चिक्कोडी, ११ सौंदत्ती, १२ बेळगांव, १३ नरगुंद, १४ शिरोडा, १५ चिपळूण, १६ कणकवली, १७ निपाणी, १८ बैलहोंगल, १९ मिरज, २० अथणी, २१ देवगड, २२ ठळकवाडी बेळगांव, २३ सावंतवाडी.

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ६,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड्स | रु. | २,४६,००० |
| ठेवी | रु. | १,०५,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | १,२०,०,०००० |

बेळगांव येथें बँकेच्या स्वतःच्या मालकीच्या इमारतींत अद्ययावत् पद्धतीचा सेफ डिपॉझिट व्हॉल्ट ता. १०।४।१९५३ पासून सुरू आहे. ता. १।९।५४ पासून सेफ डिपॉझिट व्हॉल्टमधील लॉकर्सचे दर लोकांचे खास सोयींकरितां कमी केले आहेत. तरी सर्वांनीं व्हॉल्टला एक वेळ भेट देऊन, सवलतींचे दराचा अवश्य फायदा घ्यावा.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

एच्. एल्. कुलकर्णी, मॅनेजर.

## सांगली बँक लि.

स्थापना १९१६ : शेड्यूल्ड बँक

मुंबई शाखा — फोर्ट

| | |
|---|---|
| वसूल भांडवल | $4\frac{1}{2}$ लक्ष रु. |
| रिझर्वस् व इतर फंडस् | $5\frac{3}{4}$ लक्ष रु. |
| खेळतें भांडवल | सव्वा कोटींवर |

— व्याजाचे दर —

| | द. सा. द. शें. |
|---|---|
| करंट ... ... | रु. ०–८–० |
| सेव्हिंग ... ... | रु. १–८–० |
| स्पे. सेव्हिंग ... | रु. २–०–० |
| १ वर्ष मुदत ... | रु. ३–०–० |
| २ वर्षे मुदत ... | रु. ३–४–० |
| ३ वर्षे मुदत ... | रु. ३–८–० |
| ४ वर्षे मुदत ... | रु. ३-१२-० |
| ५ वर्षे मुदत ... | रु. ४–०–० |

कॉल डिपॉझिट स्वीकारतो.

बँकिंगचे इतर सर्व व्यवहार केले जातात.

मॅनेजर.

## बँक ऑफ पूना लि.

(शेड्यूल्ड बँक)

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | पन्नास लक्ष रु. |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें | पंचवीस लक्ष रु. |
| वसूल भांडवल | साडेबारा लक्ष रु. |

संचालक मंडळ :

१. श्री. दत्तात्रय रामचंद्र नाईक, जे. पी., *अध्यक्ष*
२. डॉ. ना. भि. परुळेकर, एम्. ए., पीएच्. डी.
३. श्री. फ्रामजी पी. पोचा
४. श्री. गणपतराव काळुराम ऊर्फ बाळासाहेब नाईक

मुख्य ऑफिस :—४५५ रविवार पेठ, पुणें २

शाखा:—(१) सदाशिव पेठ, पुणें १. (२) डेक्कन जिमखाना चौक, पुणें ४. (३) सोलापूर (४) सांगली.

★

मुख्य ऑफिस व सांगली येथें माफक भाड्यांत सेफ–डिपॉझिट लॉकरची सोय. खातेदारांना भाड्यांत सवलत.

सदाशिव पेठ व डेक्कन जिमखाना शाखांच्या कामाच्या वेळा सकाळ–सायंकाळ आहेत.

व्याज—चालू ठेव अर्धा टक्का ★ सेव्हिंग्ज—दीड टक्का

तीन महिन्यांपासूनच्या मुदतठेवींवर ३ टक्के व्याज.

गो. गं. साठे, मॅनेजर

## अफगाणिस्थानला रशिआची आर्थिक मदत

सोव्हिएट रशिआनें आशिआंतील अविकसित राष्ट्रांना आर्थिक व तांत्रिक मदत देऊं केली आहे. पण ही मदत रशिआ प्रत्यक्ष देऊं शकेल किंवा नाहीं ह्यासंबंधीं दोन भिन्न मतें दिसून येतात. कांहीं तज्ज्ञांच्या मतानें रशिआंतील व त्याच्या अंकित असणाऱ्या प्रदेशांतील राहणीचें मान इतकें निकृष्ट आहे कीं तें आणखी खालीं नेल्याशिवाय मागासलेल्या राष्ट्रांना मदत करणें शक्य होणार नाहीं; उलट इतर कांहीं निरीक्षकांच्या मतानें रशिआ आर्थिक व तांत्रिक मदत देऊं शकेल परंतु ती पाश्चात्य राष्ट्रें देऊं शकत असलेल्या मदतीशीं तुलना करतां अत्यल्पच असेल. मदत देण्यासंबंधीं रशिया कितपत कृति करतो तें कालौघाबरोबर दिसेलच. तथापि, कांहीं प्रमाणांत रशिअन मदत दिला जात आहे ह्यात शंका नाहीं. भारतांत उभारण्यांत येणारा भिलई येथील पोलादाचा कारखाना हें ठळक उदाहरण आहे. अशाच प्रकारची कांहीं मदत रशिआ अफगाणिस्थानलाहि देत आहे. रशिआ व अफगाणिस्थान ह्या दोन देशांची खूप लांब सरहद्द आहे. अफगाणिस्थानच्या सरकारनें आपल्या देशाच्या औद्योगिक विकास करण्यासाठीं एक पंचवार्षिक कार्यक्रम आंखला आहे. ह्या कार्यक्रमांत रस्ते व दळणवळणाचीं साधनें ह्या दोन बाबींवर अधिक भर देण्यांत आला आहे. अफगाणिस्थानला आर्थिक मदत देण्यासाठीं रशिअन सरकारनें ह्यापूर्वीच दोन करार केलेले आहेत. अफगाणिस्थानची राजधानी काबूल येथील मुख्य रस्ते डांबरी करण्याचें काम सध्या रशिअन एंजिनिअर्स करीत आहेत. त्याचप्रमाणें धान्य सांठविण्यासाठीं रशिआ गुदामेंहि बांधून देणार आहे. पाकिस्तान, इराक, इराण व तुर्कस्थान ह्या राष्ट्रांनीं अमेरिकेची लष्करी मदत घेतलेली आहे. ह्या पार्श्वभूमीवर रशिआनें चालविलेला अफगाणिस्थानचा अनुनय सार्थ वाटतो. •

---

**शेतीच्या यांत्रिक अवजारांची देणगी**—रशिआकडून भारताला ६० लाख रुपये किंमतीचीं शेतीचीं यांत्रिक अवजारें भेटीदाखल मिळणार आहेत. ह्यासंबंधीं रशिआचे शेतिविषयक उपमंत्री हे भारतीय सरकारशीं वाटाघाटी करीत आहेत. ह्या यंत्रांच्या साह्यानें भारतांत संपूर्णतया यंत्रांवर चालविण्यांत येणारें मोठें शेत सुरू करण्यांत येईल असें समजतें. मि. कुश्चेव्ह ह्यांनीं भारतामधील शेतीच्या यांत्रिकीकरणाबद्दल अनुकूल मत व्यक्त केलें आहे.

**सहकारी बँकेची स्थापना**—कच्छ मांडवी येथें सहकारी बँकेची स्थापना करण्यासाठीं ७ लाख रुपयांचें कर्ज देण्याचें कच्छच्या सरकारनें ठरविलें आहे. स्थानिक व्यापाऱ्यांची व धंदेवाल्यांची सोय करण्याचा बँकेचा हेतु आहे. स्थानिक व्यापाऱ्यांची सभा ह्या कामासाठीं बोलाविण्यांत आली असतां सभेंत ७३,००० रुपयांच्या भाग भांडवलाची विक्री झाली.

**हैदराबाद राज्यांतील उसाची लागवड**— हैदराबाद राज्यांतील उसाची लागवड कांहीं विवक्षित भागांतच केंद्रित करण्याचा राज्य सरकार विचार करीत आहे. सध्या राज्यांत १५,६०० एकर जमिनींत उसाची लागवड करण्यांत येते. पण हैदराबाद येथील निझाम शुगर फॅक्टरी सुमारें ११,००० एकरांतील उसाचाच साखरेसाठीं उपयोग करूं शकते. ह्या भागांत आणखी एक साखरेचा कारखाना काढण्याचाहि विचार चालू आहे.

**ऑस्ट्रेलिआची भारताला मदत**—कोलंबो योजनेप्रमाणें चालू वर्षी ऑस्ट्रेलिआकडून भारताला पुढीलप्रमाणें मदत मिळणार आहे ऑल इंडिआ रेडिओसाठीं लागणारीं कांहीं उपकरणें ऑस्ट्रेलिआ देणार आहे. त्यांची किंमत ६४ लाख रुपये होईल. त्याशिवाय भारतीय रेल्वेसाठीं १,००० मालवाहू डबे देण्यांत येतील. त्यांची किंमत सुमारें १·२७कोटी रुपये आहे.

**धान्य दळण्याची लाकडी गिरणी**— अमरेलीजवळ चाकरगड नांवाच्या खेड्यांत गांवांतील तरूणसंघातर्फे धान्य दळण्याची लाकडाची गिरणी चालू करण्यांत आली आहे. गिरणी चालविण्यासाठीं बैल जोडावा लागतो. एका तासांत दीड मण धान्य गिरणींत दळून होतें. गिरणींत दळलेल्या पिठांत धान्यांतील जीवनसत्त्वें अधिक प्रमाणांत राखलीं जातात.

**अहमदाबाद कॉर्पोरेशनचें अंदाजपत्रक**—अहमदाबादच्या म्युनिसिपल कमिशनरनें १९५६-'५७ सालचें अंदाजपत्रक स्टॅंडिंग कमिटीला सादर केलें. अंदाजपत्रकांत २१,४४,००० रुपयांची तूट दाखविण्यांत आली आहे. उत्पन्नाच्या बाजूला २,५२,१४,००० रुपयांची जमा दाखविण्यांत आली असून २,७३,५८,००० रुपये खर्चाच्या बाजूला दाखविण्यांत आले आहेत. कोणताहि नवीन कर बसविण्याची सूचना करण्यांत आलेली नाहीं.

**पाकिस्तानची कर्जाची मागणी**—पश्चिम पाकिस्तानांत झालेल्या प्रचंड जलप्रलयामुळें पाटबंधाऱ्यांची व कालव्यांची मोठ्या प्रमाणावर हानि झाली. ही मोडतोड व नासधूस दुरुस्त करण्यासाठीं कांहीं प्रकारच्या यंत्रसामुग्रीची गरज आहे. पाकिस्तान सरकारनें जरूर तीं यंत्रें विकत घेण्यासाठीं जागतिक बँकेकडे ५ कोटी रुपयांचें कर्ज मागितलें आहे.


नवीन वर्षासाठीं योग्य उपक्रम

आर्थिक व्यवहार समाधानकारक करण्यासाठीं आपलें खातें योग्य बँकेंत ठेवणें महत्त्वाचें आहे. प्रतिष्ठित परंपरा, सुरक्षितता व बँकिंगच्या आधुनिक सोयी यासाठीं—

दि

बँक ऑफ महाराष्ट्र लि.

या बँकेचे आपण खातेदार होऊन आर्थिक सहजीवन अनुभवा.

संचालक मंडळ

| | |
|---|---|
| श्री. वा. पुं. वर्दे (अध्यक्ष) | श्री. न. ग. पवार (उपाध्यक्ष) |
| श्री. धों. कृ. साठे | श्री. श्री. गो. मराठे |
| श्री. मा. रा. जोशी | श्री. फ. दो. पदमजी |
| श्री. मा. वी. शहा | श्री. भा. म. गुप्ते |
| रा. ब. म. बा. जांभेकर | श्री. म. स. पारखे |

मुख्य कचेरीः— थोरले बाजीराव रस्ता, पुणें २.

चिं. वि. जोग, मॅनेजर.

## सेंट्रल इंडियामधील सर्वांगीण कुटुंबपाहणीचा अहवाल

### कर्जबाजारीपणाचें मोठें प्रमाण : सहकारी संस्थांच्या मदतीचा अभाव

मध्यवर्ती भारतांतील (सेंट्रल इंडिया) शेतमजुरांचें वार्षिक सरासरी उत्पन्न ४१७ रु. असल्याचें भारत सरकारनें केलेल्या चौकशीवरून दिसून येतें. याबाबतचा अ. भा. आंकडा ४४७ रु. आहे. सर्वांत अधिक सरासरी उत्पन्न भोपाळ राज्यांत (४६४ रु.) व सर्वांत कमी सरासरी उत्पन्न विंध्य प्रदेश राज्यांत (३७८ रु.) असल्याचें या चौकशींत आढळून आलें. हैदराबाद, मध्य भारत व मध्यप्रदेश राज्यांतील हे आंकडे अनुक्रमें ४५५, ३९९ व ३९० रु. असे आहेत. शेतमजूर कुटुंबाच्या एकूण उत्पन्नांत शेतमजुरीचें प्रमाण ६५.७ टक्के आहे, तर इतर प्रकारच्या मजुरीपासून झालेलें उत्पन्न ७.२ टक्के होतें. शेतजमिनीच्या लागवडीपासून १३ टक्के उत्पन्न झालें, तर इतर मार्गांनीं झालेल्या उत्पन्नाचें प्रमाण १४.१ टक्के असें आहे.

अशा तऱ्हेची पाहणी भारतांत पहिलीच व सर्वांत मोठी होती व ती खेड्यांची सर्वसाधारण पाहणी, कुटुंबाची सर्वसाधारण पाहणी व कुटुंबाची सर्वांगीण पाहणी अशा तीन टप्प्यांत देशभर करण्यांत आली. यांपैकीं पहिल्या दोन टप्प्यांच्या चौकशीचे अहवाल, तसेंच पहिल्या टप्प्यांतील अ. भा. अहवाल यापूर्वीच प्रसिद्ध झाला आहे. तिसऱ्या टप्प्यांत चौकशीचें कामकाज विभागानुसार करण्यांत आलें. त्यासाठीं भारताचे सहा विभाग पाडण्यांत आले आणि मध्यवर्ती भारतांतील परिस्थितीचा परामर्ष घेणारा हा त्यांतील पांचवा अहवाल आहे. वायव्य सरहद्द भारतावरील म्हणजे या मालिकेंतील शेवटचा, अहवाल लवकरच प्रसिद्ध होईल. उपरोक्त कुटुंबपाहणीच्या अहवालांत मध्यप्रदेश, मध्यभारत, हैदराबाद, विंध्यप्रदेश व भोपाळ या पांच राज्यांतील मजुरीविषयक चौकशीवरील निष्कर्ष ग्रथित केले आहेत. चौकशीच्या कामांतील मोठमोठ्या राज्यांचे सर्वसाधारण आर्थिक व भौगोलिक परिस्थितीनुसार अनेक विभाग पाडण्यांत आले होते; ही पाहणी नमुन्यादाखल निवडलेल्या १३९ खेड्यांतील सुमारें २,०३२ शेतकी—कुटुंबांच्या बाबतींत करण्यांत आली. मध्यप्रदेश वगळतां या पाहणीची कालमर्यादा मार्च, १९५० ते फेब्रुवारी, १९५१ अशी होती. मध्यप्रदेशांत जून, १९५० ते १९५१ पर्यंत हें काम करण्यांत आलें.

### पुरुष शेतमजुरास वर्षांतून २४५ दिवस काम

पुरुष शेतमजुरास वर्षांतून सरासरी शेतकी कामांत २२१ व इतर कामांत २४ दिवस मिळून एकूण २४५ दिवस काम मिळाल्याचें या चौकशीवरून दिसून येतें. या विभागांतील राज्यांचा विचार करतां विंध्यप्रदेश राज्यांतील प्रौढ पुरुष कामगारांस सर्वांत अधिक दिवस (२९४) काम मिळालें तर मध्यभारत राज्यांतील कामगारांस सर्वांत कमी दिवस (२२१) काम मिळालें. मध्यप्रदेश, हैदराबाद व भोपाळ या बाकीच्या तीन राज्यांतील हे आंकडे अनुक्रमें २५५, २३५ व २२७ दिवस असे होते. या विभागांत १९३ दिवस हंगामी कामगार घेण्यांत आले होते.

### स्त्री कामगार

स्त्री कामगारांचें प्रमाण मध्यवर्ती भारतांत सर्वांत जास्त (५६ स्त्रिया : ३७ पुरुष) होतें. रोजंदारांचें प्रमाण अतिशय कमी असल्यानें, म्हणजे मुख्यतः आर्थिक कारणांमुळेंच हें प्रमाण अधिक आहे. या विभागांत स्त्री कामगारांना सरासरी १४१ दिवस काम मिळालें. याचें सर्वांत अधिक प्रमाण विंध्य प्रदेश राज्यांत तर सर्वांत कमी प्रमाण भोपाळ राज्यांत आढळून आलें. मध्यप्रदेश, मध्य भारत व हैदराबाद या राज्यांतील हें प्रमाण १२२ ते १५७ दिवस या दरम्यान आहे. मध्यप्रदेश, मध्य भारत आणि विंध्य प्रदेश या राज्यांत कामाच्या दिवसांचें प्रमाण महिलांपेक्षा पुरुषांच्या बाबतींत अधिक असल्याचें आढळून आलें. पुरुषांचें हें प्रमाण ह्या तिन्ही राज्यांत अनुक्रमें ५२, ५५ व ५१ टक्के आणि महिलांचें हें प्रमाण अनुक्रमें ४२, ४१ व ४४ टक्के होतें. मात्र, हैदराबाद व भोपाळ ह्या राज्यांत उलट परिस्थिति होती. पुरुषांपेक्षा महिलांनीं केलेल्या कामाच्या दिवसांचें प्रमाण जास्त होतें. ह्या राज्यांत तें अनुक्रमें ६१ व ५३ टक्के होतें. पुरुषांचें प्रमाण अनुक्रमें ३४ व ३९ टक्के होतें.

### दर माणशीं उत्पन्न व खर्च

दर माणशीं वार्षिक सरासरी उत्पन्न मध्यवर्ती भारतांत ९१ रु. होतें, तर अ. भा. सरासरी उत्पन्न १०४ रु. होतें. भोपाळ राज्यांत तें सर्वांत जास्त म्हणजे १०५ रु. होतें, तर विंध्य प्रदेशांत सर्वांत कमी म्हणजे ८२ रु. होतें. मध्यप्रदेश, हैदराबाद व मध्य भारत ह्या राज्यांतील दर माणशीं वार्षिक सरासरी उत्पन्न अनुक्रमें ८७, ९७ व ८३ रु. पडतें.

शेतमजुराच्या कुटुंबाचा ह्या विभागांतील वार्षिक सरासरी खर्च ४२८ रु. (समारंभावर होणारा ८ रु. खर्च सोडून) होता. पूर्व भारत विभागाचा अपवाद वगळतां अन्नावरील खर्चाचें शेकडेवारी प्रमाण सर्वांत जास्त म्हणजे एकूण खर्चाच्या ८७.४ टक्के होतें. हेंच अ. भा. प्रमाण ८५.३ टक्के होतें. कपडे आणि पादत्राणें, सेवा व इतर बाबी ह्या इतर गटांचा खर्च एकूण खर्चाच्या अनुक्रमें ६.१ व ५.४ टक्के होता; तर घरभाडें व दुरुस्ती, जळण व प्रकाश या गटांचा खर्च अनुक्रमें ७.२ व ०.९ टक्का होता.

### कर्जबाजारीपणा

देशाच्या ह्या विभागांतील शेतमजुरांच्या परिस्थितीची आर्थिक दृष्ट्या केलेल्या या विस्तृत पाहणीच्या अहवालांत, सुमारें ५५ टक्के शेतमजूर कुटुंबांना कर्ज असून, अशा दर कुटुंबाचें सरासरी कर्ज १०३ रु. आहे ही गोष्ट दिसून येते.

भारताचा वायव्य विभाग वगळून इतर विभागांतील कर्जबाजारीपणापेक्षा भारताच्या मध्यवर्ती विभागांत हें प्रमाण सर्वांत जास्त असल्याचें ह्या अहवालांत दिलें आहे. शेतमजुरांना मुख्यतः मालक, सावकार, मित्र व आप्त यांच्याकडून कर्ज मिळतें. सहकारी संस्था व दुकानदार यांचा त्यांत जवळ जवळ कांहींच वाटा नसतो.

तमाम दंतरोगांवर
☆ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ☆

हें पत्र पुणें पेठ शिवाजिनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.